# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | |
|---|---|
| १) प्रा.डॉ.प्रकाश यशवंत बुरूटे<br>रा.सहयाद्री कॉलनी, रस्ता क्रं.२,<br>के.बी.पी.कॉलेजच्या उत्तरेस,<br>इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली | तक्रार अर्ज क्रं.०५/२०२५<br>तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १.हिंदमाता शिक्षण मंडळ, बोरगाव,<br>ता.वाळवा,जि.सांगली<br>२.मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव<br>ता.वाळवा,जि.सांगली. | वि.प. |
| २) प्रा.डॉ.विठठल नामदेव रोटे<br>रा.स्वप्नपूर्ती, रस्ता क्रं.१ अ,<br>क्रांतिसिंह नाना पाटील नगर,<br>इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली | तक्रार अर्ज क्रं.०६/२०२५<br>तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १.हिंदमाता शिक्षण मंडळ, बोरगाव,<br>ता.वाळवा,जि.सांगली<br>२.मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव<br>ता.वाळवा,जि.सांगली. | वि.प. |
| ३) प्रा.डॉ.मिलिंद शिवाजी देसाई<br>रा.बहे रोड, नवीन बहे नाका,<br>शुगरटेक कॉलेजसमोर, इस्लामपूर,<br>ता.वाळवा,जि.सांगली | तक्रार अर्ज क्रं.०७/२०२५<br>तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १.हिंदमाता शिक्षण मंडळ, बोरगाव,<br>ता.वाळवा,जि.सांगली<br>२.मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव<br>ता.वाळवा,जि.सांगली. | वि.प. |
| ४) प्रा.डॉ.वसंत कृष्णा मोरे<br>रा.लक्ष्मी नारायण गजानन महाराज कॉलनी,<br>गजानन महाराज महादेवनगर,<br>इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली | तक्रार अर्ज क्रं.०८/२०२५<br>तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १.हिंदमाता शिक्षण मंडळ, बोरगाव,<br>ता.वाळवा,जि.सांगली<br>२.मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव<br>ता.वाळवा,जि.सांगली. | वि.प. |

हिंदमाता शिक्षण मंडळ बोरगाव, ता.वाळवा, जि.सांगली यांचे मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव यांचेकडील प्रा.डॉ.प्रकाश यशवंत बुरूटे, प्रा.डॉ.विठठल नामदेव रोटे, प्रा.डॉ.मिलिंद शिवाजी देसाई, प्रा.डॉ.वसंत कृष्णा मोरे या चार शिक्षकांनी दि.२४/०२/२०२५ रोजी अर्ज दाखल केले आहेत. सदर तक्रार अर्जात तक्रारदार श्री.बुरटे हे दि.१५ मार्च २०२३ रोजी, श्री.रोटे हे दि.२१ ऑगस्ट २०२१ रोजी, श्री.देसाई हे दि.२० नोव्हेंबर २०२२ रोजी तसेच प्रा.डॉ.मोरे हे दि.१६ जुलै २०२३ रोजी सहयोगी प्राध्यापक पदाच्या स्थानिश्चितीसाठी पात्र झाले असल्याचे तसेच त्यासाठीचा प्रस्ताव पाठविणेबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना वारंवार विनंती अर्ज केलेले आहेत. परंतू याबाबत प्राचार्यांकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे. सदर लाभ देय तारखेपासून मिळावेत अशी मागणी नमूद केली आहे.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

नाही.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार प्रा.डॉ.प्रकाश यशवंत बुरूटे, प्रा.डॉ.विठठल नामदेव रोटे, प्रा.डॉ.मिलिंद शिवाजी देसाई व प्रा.डॉ.वसंत कृष्णा मोरे या चार शिक्षकांनी दि.२४/०२/२०२५ रोजी स्थाननिश्चितीसाठी आपण पात्र होवूनही प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही प्राचार्य करत नाहीत या तक्रारीबाबत स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केले होते. त्यानंतर दि.१२/०३/२०२५ रोजीच्या पत्रांनी या चारही शिक्षकांनी सदर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आपला स्थाननिश्चितीचा प्रस्ताव सही करून विद्यापीठास सादर केलेला आहे, त्यामुळे सदर स्थाननिश्चितीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आपल्या अर्जावरील प्रक्रियेला स्थगिती देण्यात यावी अशी विनंती केली होती. त्यानंतर दि.३०/०४/२०२५ रोजीच्या पत्रांनी सदर चारही शिक्षकांनी दरम्यानच्या काळात महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आपला स्थाननिश्चितीचा प्रस्ताव विद्यापीठास पाठवून स्थाननिश्चिती करून घेतली असून आपली कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे आपली तक्रार मागे घेत असल्याचे समितीस कळविले होते.

सदर चारही तक्रारदार यांचा उपरोक्त पत्रव्यवहार समितीने अवलोकनी घेतला असता तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमूद केलेली तक्रार मागणी पुर्ण झाली असल्याने व त्यांच्या तक्रार अर्जात कारण राहिले नसल्याने तक्रारदार यांच्या विनंतीवरून चारही तक्रारदार यांचे तक्रार अर्ज समितीकडून निकाली काढणेत येत आहेत.

**आदेश**

तक्रार निकाली काढणेत येत आहेत.

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

**दिनांक : 29 JUL 2025**

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)